पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई CB 23/2026

प्रेसनोट

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक १३/०४/२०२६ |
| --- | --- |

# ''रबाळे पोलीस ठाणे हद्दीमध्ये गोळीबार करणाऱ्या आरोपींच्या टोळीला गुन्हे शाखाने केली अटक''

रबाळे पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०६/०४/२०२६ रोजी इसम संदीप गवस व अमित मौर्या यांच्यावर गोळीबार करण्यात आला होता. सदर घटनेमध्ये अमित मोर्या हे जखमी झाले असून त्यांचेवर फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंड, मुंबई येथे उपचार चालू आहेत. फिर्यादी संदीप गवस यांनी मोटर सायकलवरुन येवून गोळीबार करणाऱ्या अनोळखी इसमांविरुध्द दिलेल्या तक्रारीवरुन रबाळे पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. ३०६/२०२६, बीएनएस कलम १०९, सह भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५,२७ प्रमाणे दिनांक ०७/०४/२०२६ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदर गंभीर गुन्हयातील अनोळखी आरोपीचा शोध घेणेकामी पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलींद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांचे मार्गदर्शनाखाली परिमंडळ १ मधील गुन्हे प्रकटीकरण पथके व गुन्हे शाखा, कक्ष १/२/३ व मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई येथील अधिकारी व अंमलदार यांची तपासकामी वेगवेगळी पथके तयार केली.

गुन्हे शाखेतील तपास पथकाने नवी मुंबई, मुंबई, ठाणे शहारातील सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांचे फुटेज व तांत्रिक तपासावरून गोळीबार करणारा आरोपी निष्पन्न केला. तसेच आरोपीने गुन्हा करताना वापरलेली मोटर सायकल सानपाडा पोलीस ठाणे हद्दीमधून चोरी झाल्याचे निष्पन्न झाले. त्याबाबत सानपाडा पोलीस ठाणे येथे दिनांक ०४/०४/२०२६ रोजी गु.रजि.नं. ९७/२०२६, बीएनएस ३०३(२) प्रमाणे मोटार सायकल चोरीचा गुन्हा दाखल आहे. तपासामध्ये मोटर सायकल चोरी करणारा आरोपी निष्पन्न करून आरोपीचा साथीदार नागेश माने याला नेरुळ येथून ताब्यात घेतले. त्याच्याकडे तपास करता त्याने राहुल सहानी याच्या सांगणेवरुन मालवणी, मालाड येथे राहणारा इसम मोहम्मद सईद अल्लाउद्दीन खान याला मोटार सायकल चोरी करण्याचे काम दिल्याची माहिती दिली. सदर माहितीवरुन आरोपी मोहम्मद सईद अल्लाउद्दीन खान याला मालवणी, मालाड, मुंबई येथून व आरोपी राहुल सहानी याला परेल, मुंबई येथून ताब्यात घेण्यात आले.

आरोपी राहुन सहानी याच्याकडे कौशल्यपुर्ण तपास करता त्याने सांगितले की, त्याने सदरचा गुन्हा हा आरोपी विशाल महाडीक व गुरफान खान, दोघे रा. ऐैरोली, नवी मुंबई यांचे सांगणेवरून केला. आरोपी विशाल महाडीक व गुरफान खान यांचा फिर्यादी यांचेबरोबर असलेल्या जुन्या भांडणाचा राग मनात धरुन तसेच जखमी अमित मौर्या याने १ वर्षापुर्वी RTI अर्ज करुन मनपामार्फत त्यांची अनधिकृत इमारत पाडल्याचा राग असल्याने रोख रक्कम १०,०००/— रुपये व 1 BHK फ्लॅट देण्याच्या मोबदल्यात त्याने यातील फिर्यादी व साक्षीदार यांचेवर जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने अग्निशस्त्राने चार राउंड फायर करून गंभीर जखमी केले.

आरोपी राहुल सहानी याने दिलेल्या माहितीवरुन आरोपी गुरफान लल्लन खान व विशाल विलास महाडीक यांना ऐरोली, नवी मुंबई येथून ताब्यात घेतले. एकंदर तपासामध्ये सर्व ५ आरोपींनी फौजदारीपात्र कट रचून फिर्यादी संदिप गवस व साक्षीदार अमित मौर्या यांचेवर जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने अग्निशस्त्राने गोळीबार केला व साक्षीदार यांना गंभीर जखमी केले असल्याचे निष्पन्न झाले. सदर गुन्हयात ०५ आरोपींना अटक केली असुन

त्यांची दिनांक १७/०४/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे. सदर गुन्हयाचा तपास रबाळे पोलीस ठाणे करीत आहे.

- अटक आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभुमी,

**(१)** आरोपी राहुल जमनादास सहानी, वय ३८ वर्षे, व्यवसाय—मजुरी रा.साईतेज होम, डी २६ सेक्टर ०४ ऐरोली, नवी मुंबई याचेवर दाखल गुन्हे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजि.नं. व कलम |
|---|---|---|
| १) | BCB CID MUMBAI | गु.रजि.नं. २३/२०१२, भादंवि कलम ३८७, सह मोक्का |

**(२)** आरोपी नामे विशाल विलास महाडीक, वय ४६ वर्षे, व्यवसाय——कन्स्ट्रक्शन, रा. छत्रपती शिवाजी रहीवाशी संघ, गेट नंबर ०१, रूम नंबर १७१७/९, ऐरोली गाव, नवी मुंबई याचेवर दाखल गुन्हे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजि.नं. व कलम |
|---|---|---|
| १) | रबाळे पोलीस ठाणे | ६४७/२०२५, बीएनएस २९६(ब). |
| २) | रबाळे पोलीस ठाणे | ७८८/२०२५, बीएनएस ११५ (२), ३५२. |
| ३) | रबाळे पोलीस ठाणे | अदखलपात्र गु.रजि.नंबर १७७२/२०२५ बी.एन.एस कलम ३५२, ३५१(२). |
| ४) | रबाळे पोलीस ठाणे | अदखलपात्र गु.रजि.नंबर २४९३/२०२५ बी.एन.एस कलम ३५२, ३५१(२). |
| ५) | रबाळे पोलीस ठाणे | अदखलपात्र गु.रजि.नंबर ३०९५/२०२५ बी.एन.एस कलम ३५१(२). |

**(३)** आरोपी नामे गुरफान लल्लन खान, वय ४६ वर्षे, व्यवसाय—कन्स्ट्रक्शन, रा.रूम नंबर बी ४४१ सिडको कॉलनी सेक्टर,०२ ऐरोली,नवी मुंबई याचेवर दाखल गुन्हे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.रजि.नंबर व कलम |
|---|---|---|
| १) | रबाळे एम.आय.डी. सी. पोलीस ठाणे | गु.रजि.नंबर ६०/२०२४ भादवि कलम ३२६, ३२४, ५०४, ५०६, ३४. |
| २) | रबाळे पोलीस ठाणे | गु.रजि.नंबर ६२०/२०२५ बी.एन.एस कलम १२६(२), ३५१(२), ३५२, ३(५). |

(४) आरोपी नामे मोहमद सईद अल्लाउददीन खान, वय ४७ वर्षे, व्यवसाय—ड्रायव्हर रा. गेट नंबर ०८ अंबुजवाडी मालवणी, मालाड पश्चिम मुंबई याचेवर दाखल गुन्हे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.रजि.नंबर व कलम |
|---|---|---|
| १) | विरार पोलीस ठाणे | गु.रजि.नंबर १३०१/२०२१ भादवि कलम ३८०, ४५७. |

(५) आरोपी नामे नागेश हनुमंता माने, वय ४५ वर्षे, व्यवसाय—हाऊस किंपीग, रा.मारवाडी चाळ सेक्टर ०१ शिरवणे, नेरूळ,नवी मुंबई याचेवर दाखल गुन्हे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.रजि.नंबर व कलम |
|---|---|---|
| १) | कळवा पोलीस ठाणे | ८८२/२०२०, जुगार कायदा कलम १२ ए. |

सदर उल्लेखनीय कारवाईची कामगिरी सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, श्रीमती प्रेरणा कट्टे, सहा.पोलीस आयुक्त, रबाळे विभाग श्री.राहुल धस यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि, मध्यवर्ती कक्ष, सुनिल शिंदे वपोनि, कक्ष—१, श्री.तानाजी भगत, वपोनि, कक्ष—२, श्री. अनिल पाटील, वपोनि, कक्ष—३, श्री.अविनाश काळदाते, वपोनि, रबाळे पोलीस ठाणे, श्री.बाळकृष्ण सावंत तसेच गन्हे शाखा व रबाळे पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

★★★★★★★